# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शाहुपूरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0798 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**12/11/2025 23:54

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 06/11/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 12/11/2025
**Time From (वेळेपासून):** 16:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/11/2025 **Time (वेळ):** 23:54 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 062
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/11/2025 23:54 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** भुसंपादन विभाग-6 कार्यालय,कोल्हापूर व जिल्हाधिकारी कार्य,एसबीआय बंके समोर कोल्हापूर
(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): वैष्णवी सुरेश पाटील
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1980
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,कोल्हापूर,कोल्हापूर,शाहुपूरी,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9764140777

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | इलाही मिरा मुल्ला | | | 1. 2519/क्र4,डागे गल्ली, जूना बुधवारपेठ,कोल्हापूर,कोल्हापूर, शाहुपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रु भारतीय चलनी दराच्या | 8,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | 16 नोटा | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

8,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक - 12/11/2025

मी श्रीमती वैष्णवी सुरेश पाटील वय-45 वर्षे, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो. नं. 9764140777 समक्ष शाहुपूरी पोलीस ठाणेस हजर राहुन फिर्याद देते की, दिनांक 06/11/2025 रोजी तक्रारदार भुषण महावीर पाटील, वय- 34 वर्षे, व्यवसाय - शेती, रा.मांगुर, ता. निपाणी, जि.बेळगाव,राज्य कर्नाटक यांनी अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे येवून त्यांची तक्रार सांगितली की, माझे वडील महावीर पाटील, आत्या सावित्री पाटील, तिचे पती बापुसो पाटील यांचे नावे रेंदाळ, ता. हातकणंगले, जि.कोल्हापूर येथे गट नंबर 987 मध्ये सामाईक शेतजमीन आहे. माझे वडील दिनांक 20/11/2023 रोजी मयत झाले असुन, वडील मयत झाले नंतर काही मालमत्तावर अजुन त्यांचीच नावे आहेत. सदर आमचे रेंदाळ, ता. हातकणंगले येथील गट नंबर 987 मधील शेत जमीनीतील सर्वांचे मिळुन 0.60 आर. क्षेत्र दुधगंगा कालव्यासाठी भुसंपादन विभाग महाराष्ट्र शासन यांनी भूसंपादित केली आहे. आमच्या भूसंपादित केलेल्या जमीनीचा न्याय नुकसान भरपाई मिळणेच्या अनुषंगाने माझे वडील , काका, व आत्या यांचे नावे दिनांक 26/03/2025 रोजीचे अन्वये नोटीस आली होती. म्हणुन मी भूसंपादन झालेल्या आमच्या जमीनीचा मोबदला रक्कम मिळणेसाठी दिनांक 04/09/2025 रोजी उपजिल्हाधिकारी सो भूसंपादन क्रमांक 6 जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर येथे अर्ज केला होता.अर्जाची चैकशी करणेसाठी मी दिनांक 06/11/2025 रोजी भूसंपादन 6, कार्यालयात गेलो होतो. त्यावेळी तेथील कार्यालयात असलेले ईलाही मुल्ला हे मला भेटले त्यावेळी मी त्यांना माझे अर्जाबाबत तसेच जमीनीचा मोबदला मिळणेबाबत बोललो असता त्यांनी मला माझे जमीनीचा मोबदला लगेच मिळवुन देतो त्याकरीता 10,000/- रूपये दयावे लागतील असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना पैसे थोडे कमी करा असे म्हणालो त्यावेळी त्यांनी पैसे कमी करण्यास नकार दिला. त्यावेळी मी त्यांना पैशाची तयारी झालेनंतर तुम्हाला भेटतो असे सांगुन निघून आलो होतो.भूसंपादन 6, कार्यालयातील ईलाही मुल्ला हे माझेकडे मागत असलेले 10,000/- रूपये हे लाच म्हणुन मागणी करीत असलेची माझी खात्री झाली आहे. परंतु ते मागत असलेली लाच रक्कम त्यांना देणेची मला इच्छा नाही. मी भुसंपादन कार्यालयातील ईलाही मुल्ला यांना दिनांक 06/11/2025 रोजी दुपारी 3.30 वा चे सुमारास भेटणेस जाणार आहे. तरी त्यांचेवर आपणाकडुन कायदेशीर कारवाई व्हावी असे सांगुन लेखी तक्रार आमचेकडे दिली

त्यानंतर आम्ही लागलीच तक्रारीवर कारवाई होणेकामी विद्युत निरीक्षक,उद्योग उर्जा व कामगार व खणीकर्म विभाग, कोल्हापूर या कार्यालयाशी पत्रव्यवहार करून दोन पंच यांना 15.00 वा ला.प्र.वि कोल्हापूर कार्यालयात येणेबाबत कळविले व कार्यालयातील पोहेकॉ/983 विकास माने,पोहेकॉ/2009 संदिप काशिद, पोना/2061 सचिन पाटील,पोकॉ/2608 उदय पाटील यांना गोपनीय कामामध्ये सामील करून घेवुन, गोपनीय कारवाईसाठी आवष्यक तयारी करणेची सुचना दिली. त्यानंतर मागणी केलेले पंच उपलब्ध झालेनंतर मी तक्रारदार भुषण पाटील यांना स्टाफ, व पंच यांचेशी ओळख करून दिली. त्यावेळी आम्ही तक्रारदार भुषण पाटील यांना सुचना केलेप्रमाणे, तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचाना सांगितली. तक्रारदार भुषण पाटील यांनी तोंडी सांगितलेली व लेखी दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री झालेनंतर मी, व दोन्ही पंचानी तक्रारी अर्जावर सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार भुषण पाटील व पंच नं.01 रासम व पंच नं. 2 म्हणुन राजेंद्र चिंतामणी हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविले. पंच नं. 1 रासम यांचेसह भुसंपादन कार्यालयातील ईलाही मुल्ला यांना भेटणेसाठी जिल्हाधिकारी कार्यालय

कोल्हापूर मधील भुसंपादन विभाग 6 या कार्यालयात पाठवून देवून, भुषण पाटील यांचे तक्रारीप्रमाणे त्यांचेकडे ईलाही मुल्ला हे लाचेची मागणी करतात अगर कसे ? याची आपण प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. त्यानंतर आम्ही पडताळणी कारवाईचे अनुषंगाने तक्रारदार व पंच यांना संपुर्ण सुचना दिल्या. तसेच शासकीय डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर काढून त्यामध्ये झक्ड कंपनीचे 8 जीबीचे नवीन मायक्रो एसडीएचसी कार्ड (मेमरी कार्ड) पंचाचे समक्ष घालून, रेकाॅर्डरचे फोल्डर मध्ये यापुर्वीचे कोणतेही ध्वनिमुद्रीत संभाषण नसलेची तक्रारदार भुषण पाटील व पंचाची खात्री करून दिली. तसेच डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर चालू बंद करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. त्यानंतर तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाची निवेदने व्हाईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड केले. पडताळणी कारवाईचे अनुषंगाने व्हाईस रेकाॅर्डर 16.10 वाजता चालु करून, तो तक्रारदार भुषण पाटील यांचे गळयात काळ्या दो-याचे साहयाने, अडकवुन तक्रारदार पाटील व पंच नं.1 रासम यांना ईलाही मुल्ला यांची भेट घेण्याकरीता, पंच नं.1 रासम यांचेकडील हिरो होंडा सी.डी.डिलक्स मो.सा.नं. डभ्.09.ट.1747 वरुन ईलाही मुल्ला यांची भेट घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर येथील भूसंपादन विभाग 6 येथे पाठविले. त्यानंतर काहीवेळाने तक्रारदार भुषण पाटील व पंच नं.1 रासम असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 16.49 वाजता बंद केला.

त्यावेळी आम्ही प्रथम पंच नं.01 रासम यांना ईलाही मुल्ला यांना भेटणेस गेलेनंतर तेथे काय घडले, याबाबत विचारले असता,त्यांनी तक्रारदार पाटील यांचे सोबत जिल्हाधिकारी कार्यालय येथील भूसंपादन विभाग 6 चे कार्यालयात गेलो त्यावेळी, तक्रारदार भुषण पाटील हे मुल्ला यांना भेटले. तक्रारदार यांचे वडील तसेच आत्या व काका यांचे रेंदाळचं भूसंपादीत झालेल्या जमिनीचा शासनाकडून मिळणा-या मोबदल्याचे कामाचे अनुषंगाने बोलणे होवून, जिल्हाधिकारी कार्यालय, भूसंपादन विभाग येथील मुल्ला यांनी ''तिघाचं एकावेळी झालं पाहिजे ना, आता तुमचं तर करून जाणार मग... तिघांना त्यासाठी बोलवलं एकाच वेळी झालं असतं...असे म्हणाले त्यावर तक्रारदार यांनी ''तरी अंदाजे किती'असे विचारले असता त्यावर मुल्ला,''तुम्हाला सांगितलेलं ना किती ते'' असे बोललेवर तक्रारदार पाटील,''दहा हजार'' असे म्हणाले. त्यावर मुल्ला यांनी '' सगळयाचं मिळून, तिघाचं मिळून'' असे म्हणाले. असे बोलून मुल्ला यांनी तक्रारदार पाटील यांचेकडून 10000/- रुपये लाचेची मागणी केली.त्यावर तक्रारदार पाटील, ''काय जरा कमी'' असे म्हणाले त्यावर मुल्ला,''सगळयाचं मिळून, मी तुम्हाला मागीतलं पण नसतं, उगीचं शेरा मारून ठेवलाय त्यान घोळ'',ते करून दिड महिना लावला, जीआर लावतो काय तरी करतो, जावू दे, मला काय देवू नका त्यालाचं दया''असे म्हणाले त्यावर तक्रारदार पाटील,''तुमचं काय असेल तर सांगा''असे म्हणाले त्यावर मुल्ला,''दहा हजार तिघांत जास्त नाही ओ, अस म्हटलं मी समजल का या उदया या घेवून या''असे बोलून तक्रारदार यांचेकडे 10000/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम उदईक रोजी स्विकारण्यास सहमती दर्षविली. परंतू पडताळणीमध्ये मुल्ला यांनी,''सगळयाचं मिळून, मी तुम्हाला मागीतलं पण नसतं, उगीचं शेरा मारून ठेवलाय त्यान घोळ'' असे म्हणाले असून त्या अधिका-याकरीता पैसे मागत असल्याने सदर अधिकारी कोण याबाबत तक्रारदार यंाचेकडे विचारपुस केली असता त्यांनी भुसंपादन कार्यालयातील गावीत साहेब असे सांगितले. ईलाही मुल्ला यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम ही स्वतःसाठी अगर सदर प्रकरणावर शेरा मारणारे गावीत साहेब यांचेसाठी करत आहे अगर कसे? याबाबत अधिक स्पष्टता येणेसाठी तक्रारदार यांना गावीत यांची भेट घेण्यासाठी पाठवून पडताळणी करणे आवश्यक असल्याने दि.07/11/2025 रोजी पुढील कारवाई करण्याचे सर्वानुमते ठरविले व तक्रारदार पाटील, पंच व सापळा पथक यांना त्यांचे तक्रारीबाबत गोपनीयता ठेवण्याची व आमचेशी संपर्कात राहणेची सुचना दिली.सदरवेळी वापरणेत आलेले मेमरीकार्ड उदईक रोजी वापरण्यात येणार असल्याने ते सुरक्षितरित्या प्लास्टिक केसमध्ये ठेवून आमचे ताबेत घेतले.

त्यानंतर दिनांक 07/11/2025 रोजी 11.45 तक्रारदार भुषण पाटील हे ला.प्र.वि कोल्हापूर कार्यालयात हजर झालेनंतर, आम्ही तक्रारदार व पंच यांना जिल्हाधिकारी कार्यालयातील भुसंपादन विभाग 6 कार्यालयातील ईलाही मुल्ला यांनी तक्रारदार यांचेकडे मागणी केलेली लाच रक्कम ही स्वतःसाठी अगर सदर प्रकरणावर रिमार्क मारणारे अधिकारी यांचेसाठी करत आहे अगर कसे ? याबाबत तक्रारदार यांना जिल्हाधिकारी कार्यालय,भूसंपादन विभाग येथे ईलाही मुल्ला व कार्यालयातील वरिष्ठ गावीत यांची भेट घेण्यासाठी पाठवून पडताळणी करणे आवश्यक असल्याचे सांगुन तक्रारदार व पंच यांना सुचनांची उजळणी केलेनंतर तक्रारदार यांचे गळयात डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डर अडकविला. तेव्हा त्यामध्ये दि.06/11/2025 रोजी वापरलेले मेमरी कार्ड असलेचे तक्रारदार व पंच यांना दाखवून ला.प्र.वि कोल्हापूरचे कार्यालयातून तक्रारदार व पंच नं.1 रासम यांना पंच नं.1 यांचे मोटारसायकलवरून पडताळणी करीता 13.08 वा रवाना केले. त्यांनतर काही वेळाने तक्रारदार भुषण पाटील व पंच नं.1 रासम असे आम्ही थांबलेल्या ठिकाणी परत आले. त्यावेळी व्हाईस रेकाॅर्डर 13.42 वा वाजता बंद केला.

आम्ही प्रथम पंच नं.01 रासम यांना जिल्हाधिकारी कार्यालय भुसंपादन विभाग 6 मधील गावीत यांना भेटणेस

गेलेनंतर, तेथे काय घडले याबाबत विचारले असता, त्यांनी सांगितले की, जिल्हाधिकारी कार्यालय भुसंपादन विभाग 6 मधील कार्यालयात गेल्यावर तेथे तक्रारदार पाटील व गावीत यांची भेट झाली तेव्हा तक्रारदार यांचे रेंदाळचं भूसंपादीत झालेल्या जमिनीचा शासनाकडून मिळणा-या मोबदल्याचे कामाचे अनुषंगाने बोलणे झाले त्यामध्ये तक्रारदार पाटील, नमस्कार अं,रेंदाळच्या कामासाठी होते, माझं काल चाच्यांनी निरोप दिलेला...'' त्यावर गावीत साहेब यांनी '' होय ते काय...,आता चाच्या गेले की,असे बोलले त्यावर तक्रारदार पाटील ' मला काल निरोप दिलेला, काल बोललेले माझे बरोबर, साहेबांना बोलतो माझ मी पैशाबददल ते' असे सांगितले. त्यावर गावीत साहेब' मी काय म्हणतोय तुमचं तुम्हाला माहित आहे, तर कशाला विषय काढता.विचारतो त्याला मी नेमक काय विषय आहे तो ...'असे बोलले. त्यावर तक्रारदार पाटील, तरी पण काय त्यात कमी जास्त होणार काय, असे विचारले त्यावर गावीत साहेब यांनी,फाईल बधितल्याशिवाय लक्षात येणार नाही तुमच काय काम आहे ते,' असे सांगितले व मुल्ला येईपर्यंत थांबणेस सांगुन, त्यांची भेट घेणेस सांगितलेनंतर मी व तक्रारदार असे आम्ही परत आलेचे सांगितले. तक्रारदार पाटील यांना अधिकारी गावीत यांना भेटलेनंतर काय हकीकत घडली याबाबत विचारले असता त्यांनी पंच नं. 1 रासम यांचेप्रमाणेच हकीकत सांगितली. यावरून गावीत यांचे लाच मागणीचे पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदार भुषण पाटील व गावीत यांचेत तक्रारदार यांचे जमीनीचा मोबदला मिळणेबाबत बोलने झाले परंतु, गावीत यांनी पैशांची मागणी केलेली नसुन, त्यांनी ईलाही मुल्ला यांची कामाचे अनुषंगाने भेट घेणेस तक्रारदार यांना सांगितलेचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आम्ही तक्रारदार पाटील व पंच यांना मागे दिलेल्या सुचनांची उजळणी करून, तक्रारदार यांना पुन्हा ईलाही मुल्ला यांची भेट घेणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय भुसंपादन विभाग 6 कोल्हापूर येथे पंच रासम यांचेसह डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 15.08 वा चालु करून पंच रासम यांचे मोटारसायकलवरून पाठविले. काहीवेळाने तक्रारदार भुषण पाटील व पंच नं.1 रासम हे ला.प्र.वि कार्यालय कोल्हापूर ठिकाणी परत आलेनंतर, आम्ही व्हाईस रेकॉर्डर 15.40 वा वाजता बंद केला. व पंच नं. 1 रासम यांना जिल्हाधिकारी कार्यालय भुसंपादन विभाग 6 मधील मुल्ला यांना भेटणेस गेल्यावर काय घडले, याबाबत विचारले त्यावेळी पंच नं. 1 रासम यांनी सांगितले की, मी व तक्रारदार असे जिल्हाधिकारी कार्यालय भुसंपादन विभाग 6 येथे मुल्ला यांना भेटलो असता मुल्ला व तक्रारदार यांची भेट झालेनंतर तक्रारदार यांचे कामाचे अनुषंगाने बोलणे होवून, तक्रारदार यांनी,''काय कमी जास्त करुन दयायचं देवू' असे म्हणाले. त्यावेळी मुल्ला, 'दया आता, काय तुम्ही बोलणार आता, आम्ही काय करणार, दुस-या हेच्यात पैसे मिळाल्यात त्या दुस-या प्रकरणात' असे म्हणाले. त्यावर तक्रारदार साहेबांना काय वेगळं दयायला लागणार नाही नव्ह, असे म्हणाले. त्यावर मुल्ला, ' ते दया मी देतो त्यांना, मला नको काय' असे बोलून ''काय एक कमी करा जावा,नाहीतर दोन कमी करा जावा त्यात'' असे बोलून, तक्रारदार यांचेकडून लाच रक्कमे मध्ये तडजोडीबाबत बोलणे होवून,8000 रू.लाचेची मागणी केली त्यावेळी तक्रारदार यांनी गावीत साहेबांना भेटू काय असे विचारले असता मुल्ला यांनी गावीत हार्यकोर्ट येथे गेले असल्याचे सांगितले. तक्रारदार पाटील यांनी सोमवारी त्यांची व इतर नातेवाईक यांची डॉक्युमेट घेवून आले तर चालेले काय, असे विचारले असता, ईलाही मुल्ला यांनी सहया लागणार व्हाऊचरवर, त्याशिवाय तुमच्या हेच्यावर ट्रन्सफर होणार नाहीत, डायरेक्ट या. मी बोलतो त्यांना, काय असेल ते. असे बोलून तक्रारदार यांना लाच रक्कम सोमवारी घेवून येणेस सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार पाटील यांना मुल्ला यांची व आपली भेट होवून काय घडले याबाबत विचारले तेव्हा त्यांनी पंच रासम यांचप्रमाणे हकीकत सांगितली. यावरून भूसंपादन कार्यालय, येथील गावीत यांना तक्रारदार पाटील यांना समक्ष भेटून मुल्ला यांनी मागणी केलेल्या लाच रक्कमेबाबत काही कमी जास्त होणार काय असे विचारले, त्यावेळी गावीत यांनी नाय नाय तुमची फाईल बधितल्याशिवाय मला लक्षात येणार नाही, तुमचं काय काम आहे ते, असे म्हणाले आहेत. ईलाही मुल्ला यांनी माझी कागदपत्र घेवून सोमवार दि.10/11/2025 रोजी बोलविले असून, त्यादिवशी मुल्ला हे त्यांचेकडे असलेली माझी फाईल घेवून गावीत साहेबांची भेट करुन देतील. त्यावेळी माझी कागदपत्रे पाहून गावीत हे लाच रक्कमे संबधी माझेशी चर्चा करतील, त्यावेळी आपण पुढील कारवाई करावी, अशी तक्रारदार पाटील यांनी विनंती केलेने, दिनांक 10/11/2025 रोजी भुसंपादन कार्यालयातील गावीत यांची पडताळणी करण्याचे, आम्ही सर्वानुमते ठरविले व दिनांक 07/11/2025 रोजीची पडताळणी कारवाई स्थगित केली. सदरवेळी वापरणेत आलेले मेमरीकार्ड पुढील पडताळणी कारवाईवेळी वापरण्यात येणार असल्याने, ते सुरक्षितरित्या प्लास्टिक केसमध्ये ठेवून आमचे ताबेत घेतले.

त्यानंतर दिनांक 10/11/2025 रोजी तक्रारदार पाटील व पंच असे 14.15 वा कार्यालयात आलेनंतर त्यांना दिनांक 06/11/2025 रोजी व दिनांक 07/11/2025 रोजी पडताळणी कारवाई वेळी दिलेल्या सुचनांची उजळणी केलेनंतर, तक्रारदार यांना पुन्हा ईलाही मुल्ला यांची भेट घेणेकरीता जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूरचे, भुसंपादन विभाग 6 येथे पंच रासम यांचेसह डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर 14.40 वा चालु करून, पंच रासम यांचे

मोटारसायकलवरून पाठविले. काहीवेळाने तक्रारदार पाटील व पंच रासम हे ला.प्र.वि कार्यालय कोल्हापूर येथे परत आलेनंतर, आम्ही व्हाईस रेकाॅर्डर 16.31 वा वाजता बंद केला. त्यानंतर आम्ही पंच नं. 1 रासम यांना जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर भुसंपादन विभाग 6 येथे मुल्ला व अधिकारी गावीत यांना भेटणेस गेल्यावर काय घडले, याबाबत विचारले, त्यावेळी पंच रासम यांनी सांगितले की, तक्रारदार पाटील व मी जिल्हाधिकारी कार्यालय, भूसंपादन विभाग 6 येथे गेल्यावर ईलाही मुल्ला यांचेशी तक्रारदार यांची भेट झाली तेथे तक्रारदार, त्यांची आत्या व काका यांचे रेंदाळचं भूसंपादीत झालेल्या जमिनीचा शासनाकडून मिळणा-या मोबदल्याचे प्रस्तावा वरील व्हाऊचरवर वरिष्ठ अधिकारी यांचेसमक्ष सहया झाल्या. परंतु त्यांच्या आत्या व काका यांचे आधारकार्ड झेराॅक्स नसल्यामुळे त्याचे स्कॅनिंग होवू शकले नाही. त्यामुळे कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी मॅडम यांचे समक्ष डाॅक्युमेट स्कॅनिंगसाठी दोन दिवसांनी ''आकराच्या आसपास येण्यास सांगितले, त्यादिवशी कार्यालयात अधिकारी गावीत हे उपस्थित नसलेचे सांगितले. तेव्हा आम्ही तक्रारदार पाटील व मुल्ला यांची व आपली भेट होवून काय घडले याबाबत विचारले असता त्यांनी पंच रासम यांचेप्रमाणे हकीकत सांगितली.एकंदरीत तक्रारदार व पंच नं.01 यांनी सांगितलेल्या हकीकतीवरून तसेच डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरवर ध्वनीमुद्रीत झालेल्या संभाषणावरून तक्रारदार पाटील व भुसंपादन कार्यालयातील गावीत यांची भेट झाली नाही.तक्रारदार पाटील व मुल्ला यांची भेट झालेवर त्यांनी वरिष्ठ अधिकारी असलेल्या मॅडम यांचेकडे तक्रारदार यांना घेवून जावून भेटले असून तक्रारदार यंाचे काम वरिष्ठ महीला अधिकारी यांचेकडे असून गावीत यांचेकडे प्रलंबित नाही.तसेच मुल्ला हे देखील तक्रारदार पाटील यांना गावीत यांना भेटण्यास मनाई करत असल्यामुळे ईलाही मुल्ला हे गावीत यांचे नांव सांगून त्यांचे स्वतःकरीता लाचेची मागणी केली असल्याचे तक्रारदार पाटील यांनी खात्री झालेचे समक्ष सांगून गावीत यांची पडताळणी न करणेबाबत व मी दोन दिवसांनी पैशांची जुळणी झालेनंतर येतो त्यावेळी पुढील कारवाई करणेची विनंती केलेने नमुद दिवशी पडताळणी कारवाई बंद करून तक्रारदार हे दोन दिवसांमध्ये पैसे घेवून आलेनंतर सापळा कारवाईचे आयोजित करण्याचे ठरविले.व पडताळणी कारवाई करीता वापरण्यात आलेले मेमरीकार्ड जप्त करून सिलबंद करण्यात आले होते. त्यानंतर दिनांक 12/11/2025 रोजी तक्रारदार हे ईलाही मुल्ला यांना लाच रक्कम देणेस जाणार असलेने, सापळा कारवाई करीता पंच व सापळा पथक सफौ.प्रकाष भंडारे,मपोहेकाॅ/47 संगिता गावडे,पोहेकाॅ/2009 संदिप काशिद, पोना/2061 सचिन पाटील,पोकाॅ/2608 उदय पाटील व पोकाॅ/2302 कृष्णा पाटील यांना हजर राहणेची सुचना केली. त्याप्रमाणे ते हजर राहिल. त्यानंतर तक्रारदार, पंच हे ला.प्र.वि कोल्हापूर कार्यालयात हजर झाले. आम्ही त्यांना सापळा कारवाई सुरू करीत असलेचे सांगून, सापळा कारवाईकरीता तक्रारदार यांचेकडे लाच रकमेबाबत विचारणा करता, त्यांनी त्यांचेकडील 500/- दराच्या 16 चलनी नोटा अशी 8,000/- रूपये लाच रक्कम उपलब्ध केली.आम्ही तक्रारदार पाटील व पंचाना अॅन्थ्रॅसीन पावडरचे गुणधर्म समजावून, त्याची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात हिरवट रंगाची चकाकी दिसलेबाबत, खात्री करून दिली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने सापळा पुर्व संपूर्ण कार्यवाही केलेनंतर अॅन्थ्रॅसीन पावडर लावलेले 8,000/- रूपये तक्रारदार यांचे पॅन्टचे उजवे बाजूच्या मागील खिशात ठेवलेनंतर नोटांना अॅन्थ्रॅसीन पावडर पोकाॅ/2302 पाटील यांनी लावलेने, त्यांना सापळा पथकातून वगळले. त्यानंतर तक्रारदार पाटील,दोन्ही पंच व सापळा पथकास सापळा कारवाईचे अनुषंगाने सुचना दिल्या. तसेच तक्रारदार पाटील यांना मुल्ला यांनी लाचेची रक्कम स्विकारलेनंतर, त्यांचे पॅन्टचे डावे खिशातील हातरूमाल डावे हाताने काढुन तोंडावरून फिरवणेचा पुर्वनियोजित इशारा करणेचा सुचना दिल्या. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने डिजीटल व्हाॅईस रेकाॅर्डरमध्ये केडीएम कंपनीचे नवीन 8 जीबीचे मेमरी कार्ड टाकून तक्रारदार पाटील व दोन्ही पंचाचे निवेदन व्हाईस रेकाॅर्डर मध्ये रेकाॅर्ड केले. त्यानंतर आम्ही तक्रारदार पाटील यांना मुल्ला हे कार्यालयात उपस्थित आहेत का याची खात्री करणेकरीता, तक्रारदार पाटील यांचे मोबाईल नंबर 9036588192 वरून 12.47 वा क्लार्क मुल्ला यांचे मोबाईल नंबर 8767857599 वर फोन केला, तेव्हा ईलाही मुल्ला हे कार्यालयात हजर असलेचे समजून आले.सदरचा काॅल व्हाॅईस रेकाॅर्डरवर ध्वनीमुद्रीत करण्यात आला. त्यानंतर तात्काळ व्हाईस रेकाॅर्डर 12.53 वाजता सुरू करून, तो तक्रारदार यांचे शर्टचे आतमध्ये काळया दो-याचे साहयाने गळयात अडकवला. त्यानंतर तक्रारदार पाटील व पंच नं.1 रासम असे पंच रासम यांचे मोटर सायकलने जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर चे भुसंपादन विभाग 6 चे कार्यालयत पाठविले. त्यांचे पाठोपाठ मी, सापळा पथक, पंच नं.02 चिंतामणी असे आमचेकडील शासकीय बोलेरो निओ वाहनाने जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूरचे भुसंपादन विभाग 6 चे कार्यालयात आजुबाजुला सापळा लावुन थांबलो. त्यावेळी तक्रारदार पाटील व पंच रासम असे भुसंपादन कार्यालयात गेले थोडयावेळाने तक्रारदार पाटील, पंच रासम व मुल्ला असे कार्यालयातून बाहेर आले व मुल्ला यांनी त्यांचेकडील मोपेड हिरो माईस्ट्रो नंबर डभ्.09 थ्त्.3620 वर तक्रारदार पाटील यांना वसवुन ते कार्यालयाचे पश्चिम गेटचे बाहेर आले. तेव्हा पंच रासम हे त्यांचेकडील मोटारसायकल घेवून तक्रारदार व मुल्ला यांचेजवळ जावून थांबले. तक्रारदार व मुल्ला यांचेत बोलणे झालेनंतर

तक्रारदार पाटील हे मुल्ला यांना म्हणाले, 'हे घ्या...' त्यावर लोकसेवक मुल्ला हे, 'जरा पुढं या...' असे म्हणालेवर मुल्ला यांनी मोटारसायकल पुढे घेतली व जिल्हाधिकारी कार्यालयाचे बाहेर असले असेंब्ली रोडने थोडे अंतर पुढे येवून नष्टे हाॅल कडे जाणा-या रस्त्याने उजवीकडे वळण घेवून स्टेट बॅंकेचे समोर, रस्त्याचे कडेला मोपेड घेवून थांबले. तेव्हा तक्रारदार पाटील हे मुल्ला यांना म्हणाले, 'कुठं गेला तो आणि...' तेव्हा लोकसेवक मुल्ला यांनी त्यांची मोटारसायकलची डिक्की उघडून तक्रारदार यांना म्हणालेे, 'असू दे टाका........ जावू दे तो...' असे म्हणाले त्यावर तक्रारदार पाटील हे, 'हे घ्या...' असे म्हणाले त्यावर लोकसेवक मुल्ला हे, 'किती आहेत टाका यात..... टाका की यात...'असे म्हणुन डिक्कीत टाकणेस सांगितलेवर तक्रारदार पाटील हे, 'हेच्यात टाकू...' असे मुल्ला यांना विचारले तेव्हा ईलाही मुल्ला यांनी ,'टाका की...' असे म्हणालेवर तक्रारदार यांनी लाच रक्कम हि मुल्ला यंाचे सांगणेवरून त्यांचेकडील मोपेडच्या डिकीत टाकली. त्यानंतर तक्रारदार पाटील हे मुल्ला यांना, 'मेजून घेशीला कणी...' असे म्हणालेवर मुल्ला यांनी,' आहो तुमच्यावर विश्वास हाय, पाटील ऐवढं काय आम्ही हे नाही हाय, अस नाही हाय, कधी आपली काम आहेत अस नसतयं...' तेव्हा तक्रारदार पाटील यांनी पॅन्टचे मागील बाजूचे डावे खिशातून डावे हाताने हातरूमाल बाहेर काढुन तोंडावरून फिरवुन पुर्वनियोजित इशारा केला असता मी व पंच नं.02 चिंतामणी व स्टाफ तेथे गेलो. त्यावेळी तक्रारदार पाटील यांचेकडील व्हाॅईस रेकाॅर्डर 13.18 वा बंद करून, तात्काळ लाच स्विकारलेल्या रकमेसह ईलाही मुल्ला यांना पकडले. सदर ठिकाणी लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या केल्या. सदर घटनेचे पोकाॅ/उदय पाटील यांनी त्यांचे मोबाईलवर व्हिडीओ शुटींग केले व अल्ट्राव्हायलेटचे सहायाने ईलाही मुल्ला यांचे मोपेडच्या डिकीतील लाच रक्कम पंचाना काळया कापडाचे सहायाने दाखवण्यात आली त्यावर अॅन्थ्रॅसीन पावडरची हिरवट चकाकी दिसुन आलेने मुल्ला यांची मोपेड तसेच डिग्गीमध्ये असलेले अॅन्थ्ाराॅसिन पावडर लागलेले साहीत्यासह गाडी ताब्यात घेतले व भुसंपादन कार्यालय येथील तक्रारदार यांचे प्रकरणाची कागदपत्रे ताब्यात घेउन त्यानंतर पुढील सर्व कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी यातील मुळ तक्रारदार भुषण पाटील यांच्या वडील, आत्या व काकांचे नावे असले जमीन भूसंपादन झालेल्या जमीनीचा मोबदला रक्कम मिळणेसाठी दिनांक 04/09/2025 रोजी उपजिल्हाधिकारी साो भुसंपादन क्रमांक 6 जिल्हाधिकारी कार्यालय ,कोल्हापूर येथे अर्ज केला होता.त्याची दिनांक 03/11/2025 रोजी उपजिल्हाधिकारी सोा भूसंपादन क्रमांक 6 जिल्हाधिकारी कार्यालय कोल्हापूर येथे विचारणा करणेकरीता तक्रारदार हे जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर येथील भुसंपादन विभाग 6 कार्यालयात गेले असता, त्या कार्यालयातील ईलाही मिरा मुल्ला यांनी त्यांचे भुसंपादित केले जमिनीचा मोबदला लवकर मिळवुन देणेकरीता कार्यालयातील गावीत यांना 10,000/- रूपये दयावे लागतील, असे सांगुन तक्रारदार भुषण पाटील यांचेकडे बेकायदेशीरपणे 10,000/- रूपये लाच रकमेची मागणी करून, तडजोडीअंती 8,000/- रूपये लाचेची मागणी करून.वरीष्ठांचे नाव सांगुन स्वतःचा आर्थिक फायदा होणेकरीता 8,000/- रूपये लाच रक्कम तक्रारदार यांचेकडुन बेकायदेशिरपणे व अप्रामाणिकपणे स्विकारलेने आम्ही तसेच सापळा पथकाने पकडले आहे, म्हणुन माझी ईलाही मिरा मुल्ला, वय - 71 वर्षे, पद -(सेवानिवृत्त नायब तहसिलदार) कंत्राटी कर्मचारी, भुसंपादन विभाग - 6 कार्यालय, कोल्हापूर रा.2519/क्र.4, डी वाॅर्ड, डांगे गल्ली, जुना बुधवार पेठ, कोल्हापूर यांचेविरूध्द फिर्याद आहे.

माझा वरील वर्दीजबाब मी सांगितले प्रमाणे, संगणकावर टंकलिखित केलेला असून, तो मी वाचून पाहिला असता बरोबर आहे.

समक्ष
स. ता. म.

हा दिला जबाब स. ता. म.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
SANJIV ANNU BAMBARGEKAR
**Rank** (पद): SI (Sub-Inspector) **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
VSRE

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही)
ठाणे अंमलदार
**Name** (नाव): santosh gundopant
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): SGDM7903